**सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार क्षेत्रातील अनुकंपा नियुक्ती योजनेशी संबंधीत कोणताही धोरणात्मक निर्णय प्रशासकीय विभागांनी परस्पर न घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.अकंपा-१००९/५८२/प्र.क्र.७६/२००९/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ५ मार्च, २०११.

**परिपत्रक**

शासन सेवेत कार्यरत असतांना दिवगंत झालेल्या गट-क व गट-ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गट-क अथवा गट-ड पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची योजना व त्या योजनेत वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे ही बाब सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार कक्षेतील आहे. या योजनेतील प्रचलित तरतूदींपेक्षा वेगळा अथवा त्या तरतूदींना अपवाद करणारा असा कोणताही निर्णय प्रशासकीय विभागांनी स्वंतत्रपणे घेणे अपेक्षित नाही. तथापि, दि.२६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या अतिरेकी हल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी /कर्मचाऱ्यांचे वारसांना अनुकंपा नियुक्तीचा विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना त्याचप्रमाणे नक्षलवादी क्षेत्रात कार्यरत असतांना नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा नियुक्ती विषयक विशेष लाभ देण्याचा निर्णय घेताना महसूल व वन विभागाने व गृह विभागाने सामान्य प्रशासन विभागाशी सल्लामसलत न करता अथवा प्रस्ताव या विभागास न दाखविता परस्पर मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करुन स्वतंत्रपणे निर्णय घेतल्याचे आढळून आले आहे व अशा तऱ्हेने प्रशासकीय विभागांनी परस्पर प्रस्ताव सादर केल्यामुळे प्रस्तावाची सर्वांगीण बाजू मंत्रिमंडळासमोर/शासनासमोर विभागांकडून मांडली जात नाही ही वस्तुस्थिती आहे.

२ वस्तुत: कोणतीही नियुक्ती ही सेवाविषयक बाब असल्याने, अनुकंपा नियुक्तीसंदर्भात निर्णय घेताना सर्वंकष विचार होणे आवश्यक असते व त्यासाठी सेवाविषयक नियम/तरतूदी, वेळोवेळी पारित झालेले न्याय निर्णय तसेच घेतलेल्या निर्णयाचा राज्य स्तरावरील सर्व सेवांवर होणारा परिणाम विचारात घेऊन निर्णय घ्यावा लागतो.

३. वर नमूद केल्यानुसार प्रशासकीय विभागांनी सामान्य **प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करताच परस्पर** शासनास प्रस्ताव सादर करताना वरील कोणत्याही बाबींचा विचार केलेला दिसून येत नाही. तसेच त्यामुळे प्रचलित कार्यपध्दतीचा व संकेतांचा भंग होऊन संबंधीत प्रशासकीय विभागाकडून त्यांचे कार्यकक्षांचे उल्लंघन होत आहे ही बाबही त्या विभागांनी विचारात घेतलेली नाही. त्यामुळे विहित कार्यपध्दती अनुसरुन व सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत न करता परस्पर घेतल्या गेलेल्या निर्णयामुळे त्यामध्ये काही त्रूटी राहून भविष्यात न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवून त्यामुळे शासनाची अडचणीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
आवक नं.:-
26 MAY 2011
रोटा/एच-३०३९[३०००-३-२०११]-१
आस्थापना शाखा
दिनांक ९/६/२०११ कृ.मा.प.

वरील सर्व परिस्थिती विचारात घेऊन, सर्व प्रशासकीय विभागांना असे निदेश देण्यात येत आहेत की, सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यकक्षेतील "अनुकंपा नियुक्ती" या विषयाशी संबंधीत कोणताही प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणण्यापूर्वी तो सामान्य प्रशासन विभागाला दाखविणे व अशा कोणत्याही प्रस्तावामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायांचा समावेश मंत्रिमंडळ टिप्पणीमध्ये करणे सर्व प्रशासकीय विभागांना याव्दारे बंधनकारक करण्यात येत आहे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११०३०५१७५४३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( के.पी.बक्षी )
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव, मलबार हिल मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
*प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधान परिषद), मुंबई,
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,मुंबई,
*महालेखापल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
*महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) मुंबई,
*महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक(निवासी लेखे),कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
*पत्राव्दारे

----------